# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/11/2021 (बुधवार)

---

## –: अवैधरित्या इलेक्ट्रीक गेमिंग मशीन द्वारे पैशाची बाजी लावून हारजितचा जुगार चालविणाऱ्या अडयावर धाड स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कार्यवाही :–

काटोल शहरात नेहरू बाजार काटोल येथील दुकानात इलेक्ट्रीक गेंमिग मशीन मध्ये लोकांकडून पैसे घेवून मशीन वर पैशाची बाजी लावून हारजितचा जुगार अड्या बाबत स्थानिक गुन्हे शाखेतील पथकानी दिनांक 16/11/2021 रोजी गुप्त बातमीदार कडून माहिती प्राप्त करुन दिनांक 16/11/2021 रोजी सांयकाळी धाड घातली असता सदर दुकानात जुगार खेळण्यांचे एकुन 10 नग इलेक्ट्रीक गेमीग मशीन, 1.प्रेमराज रामचरण अरोलिया रा. चिचाळा काटोल ,2. विनोद शंकरराव सुरजुसे रा. वडपुरा काटोल 3. शारदा प्रसाद भागवतप्रसाद पटेल रा. दुर्गानाला नविन घरकुल काटोल 4.संजय राजु चिचाम रा. हनुमान नगर काटोल 5. राजु गजानन घोडे रा. आययुडीपी काटोल हे इसम दुकानाचे मैनेजर 6. मोहम्मद शरीफ वल्द अब्बास शेख रा. पेठबुधवार काटोल यांना पैसे देवून त्यांचेकडून मशिनची चाबी घेवून जुगार खेळतांना मिळून आले. मॅनेजर यांचेसह तेथील नोकर 7.प्रविण पुडंलीकराव क्षीरसागर रा. पेठबुधवार काटोल हा सुध्दा येणाऱ्या इसमांना मशिन ची चाबी देणे व त्यांचे हिशोब बघण्याचे काम करित असताना आढळून आला. सदर धाडीत एकुन 13 नग इलेक्ट्रीक गेमींग मशीन ,20 नग गेमिंग मशीनच्या चाब्या ,01 कॅलक्युलेटर ,05 प्लॉस्टीक खुर्ची ,03 प्लॉस्टीक स्टूल ,01 सी.सी.टी.व्ही.कॅमेरा,डिव्हीआर मशीन ,एल.सी.डी.मॉनीटर ,01 रजीस्टर ज्यामध्ये जुगार खेळण्याचा हिशोब लिहीलले असे एकून 2,72,920/–रू. साहित्य व जुगार खेळयाकरिता वापरण्यात आलेली रोख रक्कम 63,500/–रू.असा एकून 3,36,490/–रू. माल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र.1 ते 7 हे अवैधरित्या जुगार अडयावर इलेक्ट्रीक गेंमिग मशीन दवारे पैशाची बाजी लावून हारजितचा जुगार खेळताना व खेळवित असताना मिळून आले. दुकानाचे मॅनेजर मोहम्मद शरीफ वल्द अब्बास शेख रा. पेठबुधवार काटोल यांस विचारपुस केली असता सदर दुकान प्रकाश विठ्ठल मोरोलिया रा. नेहरू बाजार , काटोल यांचे असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी क्र. 1. प्रेमराज रामचरण अरोलिया रा. चिचाळा काटोल, 2. विनोद शंकरराव सुरजुसे रा. वडपुरा काटोल 3. शारदा प्रसाद भागवतप्रसाद पटेल रा. दुर्गानाला नविन घरकुल काटोल 4. संजय राजु चिचाम रा. हनुमान नगर काटोल 5. राजु गजानन घोडे रा. आययुडीपी काटोल, 6. मोहम्मद शरीफ वल्द अब्बास शेख रा. पेठबुधवार काटोल, 7. प्रविण पुडंलीकराव क्षीरसागर रा. पेठबुधवार काटोल यांना ताब्यात घेवून पुढील कार्यवाहीकामी पो.स्टे. काटोल चे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिटट्ावार, सपोनि राजीव कर्मलवार, जितेन्द्र वैरागडे, पोउपनि जावेद शेख, पोहवा राजेन्द्र सनोडीया, दुर्गाप्रसाद पारडे, निलेश बर्वे, विजय डोंगरे नरेन्द्र पटले, पोना दिनेश अधापुरे, पोशि अजिज शेख, बालाजी साखरे,महेश बिसने व चापोहवा भाऊराव खंडाते यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत पाटणसावंगी येथे दि. 14/11/2021 चे 20.00 वा. ते 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– आयुष देवराव महल्ले वय 17 वर्ष रा. पाटणसावंगी ता. सावनेर यांच्या घरा समोरील रोडवर वामन धनराज बल्की आणि आकाश कापसे दोन्ही रा. पाटणसांवगी यांचे वाद विवाद सुरू असतांना फिर्यादीचे वडील नामे– देवराव मारोतराव महल्ले (जखमी) वय 49 वर्ष रा. पाटणसावंगी ता. सावनेर हे आरोपी नामे– वामन धनराज बल्की वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 आदर्श नगर पाटणसावंगी यांच्या जवळ गेले असता आरोपीने जखमीला त्याच्या जवळ दारू पिवुन का आले असे म्हणुन वाद घातला. यानंतर आरोपीने फिर्यादीचे वडीलांना हातबुक्कीने मारहाण करून जिवे मारण्याच्या उदेशाने त्यांना रोडवर डोक्याच्या भारावर पाडुन डोक्याला गंभीर दुखापत(मुक्का मार) केल्याने जखमी यांचे डोक्यामध्ये रक्त गोटुन त्यांना अतिगंभीर अवस्थेत मेडिकल हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 307 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री निशांत फुलेकर मो.नं 7588564300 हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील फुलझरी येथे दि. 16/11/2021 ते दि. 16/11/2021 चे 10.00 वा. ते 17.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग.भा अंशिका राधेश्याम उईके वय 35 वर्ष रा. फुलझरी या आपले घराला कुलुप लावुन शेतात गेल्या असता अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील खिडकीतुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने गोदरेचे कपाट तोडुन आत ठेवलेले सोन्याचे दागिने किमंती 12,000/–रु.व नगदी 2,500/–रु. असा एकुण कि. 14,500/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 354, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सनतलाल मरकाम मो नं 9823825758 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील कावरापेठ नगरपरीषद पाण्याच्या टाकीजवळ येथे दि. 14/11/2021 ते दि. 15/11/2021 चे 23.50 वा. ते 05.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमित वासुदेव मोहीनकर वय 26 वर्ष रा कावरापेठ उमरेड यांची एमएच– 40/बीएम– 2699 क्रमांकाची हिरो स्प्लेंडर मोटरसायकल ही घरासमोर उभी ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची किंमती 45,000/–रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामेश्वर रावते मो.क्र. 9420409454 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कुही :– दिनांक 07/11/2021 चे 06:00 वा. दरम्यान मौजा कळमना शिवारात नागपूर उमरेड रोडवर अज्ञात मोटारसायकल चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– 40/बीझेड– 3584 क्रमांकाच्या मोटारसायकला सामेरून धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– हरीश बाबतुलाल वानखेड वय 26 वर्ष, रा. अडम हा गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता दि. 10/11/2021 रोजी डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार श्री दिलीप लांजेवार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नामदेव पुजारी मो. क्र. 7775811619 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वरः– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा फेटरी पेट्रोलपंप जवळ येथे दि. 14/11/2021 चे 23.50 वा. चे 18.30 वा. दरम्यान राजेश हरीभाउ शेंडे(मृतक) वय 20 वर्ष, रा. कॉटेज नं 88/2 एस एम क्यु वायूसेना नगर, नागपूर हा आपल्या एमएच– 31/डीइ– 5084 क्रमांकाच्या प्लेझर मोटरसायकल स्वता चालवीत आपला मित्र नामे– अजय कुमार थापा याला मागे बसवून कळमेश्वर कडून नागपूर कडे जात होता. त्यादरम्यान फेटरी पेट्रोलपंप जवळ गाय रोड क्रॉस करीत असता तिला मोटरसायकल चालकाने धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक राजेश शेंडे याच्या पोटाला गंभीर मार लागल्याने त्यास उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता दि 16/11/2021 चे सकाळी 07.40 वा. डॉक्टरांनी मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार बेलसरे, मेडीकल बुथ नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास तपास सपोनि श्री मेश्राम 9075245059 हे करीत आहे.

3) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 09 कि.मी. अंतरावरील मौजा नयाकुंड शिवार ते आमडी येथे दि. 16/11/2021 ते चे 19.00 वा. दरम्यान फियादी नामे– गौरव राधेशाम राउत वय 24 वर्ष रा. होटीटोला मनसर पो. स्टे पारशिवनी हा त्याची आई सौ. सुमन राधेशाम राउत (मृतक) व वडील राधेशाम राउत यांना त्याचे ताब्यातील एम.एच– 40/बीक्यु– 5089 क्रमांकाच्या मोटरसायकलने ट्रीपल सिट चालवत नयाकुंड ते आमडी या रोडनी जात असतांना विरूध्द दिशेने आमडी कडुन येणारी एम.एच–40/बीझेड– 6326 चे चालक आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकलवर आनखी एक ईसम बसवुन डब्बल सिट भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित फिर्यादीचे रॉग साईडला येवुन फिर्यादीचे मोटरसायकला मागील चालकाचे बाजुला धडक दिली. त्यामुळे फिर्यादी व त्यावर बसलेली आई वडील खाली पडले. या अपघातात फिर्यादीचे डावे हाताला तसेच फिर्यादीचे वडीलाचे पायाला गंभीर मार लागुन जखम झाली. तसेच फिर्यादीची आई रोडवर पडुन त्यांचा मृत्यु झाला. तसेच विरूध्द दिशेने येवुन धडक देणारा आरोपी चे मोटरसायकल वरून दोन्ही ईसम रोडवर पडुन गंभीर जखमी झाले

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास तपास पोलिस उपनिरीक्षक श्री दिलीप बासोडे मो.क्र. 9823083905 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. काटोल :— दिनांक 16/11/2021 चे 10.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान फिर्यादी यांनी दि 16/11/21 रोजी पोलीस स्टेशन काटोल येथे तक्रार दिली की, दि 16/11/2021 रोजी सकाळी 10.00 वा. ते सायंकाळी 18.00 वा दरम्यान त्यांचे गैरहजरीत त्यांची अल्पवयीन मुलगी/पीडिता वय 6 वर्ष व त्यांचा मुलगा वय 10 वर्ष यांना शेजारी पाहुणा म्हणुन आलेला आरोपी नामे— संजय बुटे, रा. सायखेडा म.प्र याने येरंडा गावातुन नवीन कपडे घेवून देण्याचे बहाण्याने काटोल येथे नेले. यानंतर आरोपीने काटोल येथे मुलीला कपडे घेवून दिले व एका शेतात नेवून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363, 354 (अ)(1)(आय), 354, भादंवी. सहकलम 8 पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि सारीका गुरूकर या करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत मौजा उमरेड येथे दिनांक 16/11/2021 चे 09.00 वा. फिर्यादीचे सासरे दयाराम ईस्तारी तांबे (मृतक), वय 55 वर्ष रा. वडेगाव ता. कुही यांनी अज्ञात कारणाने गावा जवळील स्मषानभुमी येथे गळयाला दोरीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रविण गकाराम दमके वय 31 वर्ष रा धुरखेडा, उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मनोज वाघ मो नं 9420756751 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 1 कि.मी. अंतरावरील वार्ड क्र 8 काकडे लेआउट सावनेर येथे दिनांक 16/11/2021 चे 17.00 वा. फिर्यादीची बहिण मयुरी लक्ष्मण लांजेवार(मृतक), वय 25 वर्ष, रा. वार्ड क्र 8 काकडे लेआउट सावनेर हिने अज्ञात कारणातुन आपले राहते घरी पंख्याला स्कॉपने गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रतिम लक्ष्मण लांजेवार वय 29 वर्ष रा. वार्ड क्र 1, ह.मु वाडी नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनी श्री शिवाजी नागवे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर